अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# महाराष्ट्राला झुकते माप आणि आगामी निवडणूक

नरेंद्र मोदी यांच्या नव्या मंत्रिमंडळामध्ये महाराष्ट्राला बऱ्यापैकी झुकते माप दिले गेले आहे. ४५ जणांच्या मंत्रिमंडळात महाराष्ट्राने सहा मंत्रिपदे पटकावली. पाच भाजपाच्या वाट्याला तर एक शिवसेनेला मिळाले आहे. एकूण मिळालेली मंत्रिपदे आणि खातेवाटप पाहिल्यानंतर महाराष्ट्राला नक्कीच त्याचा लाभ करून घेता येईल. यापूर्वी सुध्दा महाराष्ट्राला एनडीएच्या काळात म्हणजेच अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना अशीच ७-८ मंत्रिपदे महाराष्ट्राला मिळाली होती. परंतु काहीवेळी महाराष्ट्राचा फारसा काही लाभ होऊ शकला नाही. आताची परिस्थिती मात्र बरीचशी बदललेली आहे. नरेंद्र मोदींसारखा विकासाचे महत्त्व जाणणारा नेता पंतप्रधान झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालचे मंत्रिमंडळ सुध्दा तितक्याच आत्मियतेने विकासाची कामे करील असा विश्वास बाळगायला हरकत नाही. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे आलेले ग्रामीण विकास खाते किंवा नितीन गडकरींना मिळालेले वाहतूक खाते याशिवाय अनंत गीते यांना मिळालेले अवजड खाते याचा जर विचार केला तर महाराष्ट्राला बरेच नवीन प्रकल्प खेचून आणता येऊ शकतात. अनंत गीते यांनी या खात्याबद्दल नाराजी व्यक्त केलेली आहे. परंतु तसे पाहिले तर महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: कोकणामध्ये उद्योग उभारणी करण्याकरता त्यांना या खात्याचा चांगला उपयोग करून घेता येऊ शकेल. छोट्या मोठ्या कारणावरून नाराजी व्यक्त करण्यापेक्षा मिळालेल्या खात्यातही सर्वोत्तम काम करून दाखवण्याचे कौशल्य अनंत गिते यांनी करून दाखववावे.

फक्त महाराष्ट्रातल्या या मंत्र्यांनी आणि खासदारांनी आपली इच्छाशक्ती दाखविली पाहिजे. महाराष्ट्रातून प्रथम ४८ पैकी ४३ खासदार भाजपा सेनेच्या वतीने निवडून गेले आहेत. काँग्रेसची सत्ता असताना अशा प्रकारचे घवघवीत यश मिळविल्यामुळे मोंदीना महाराष्ट्राला असे झुकते माप देणे आवश्यकच होते. संपूर्ण देशभरातील अन्य राज्यांची स्थिती आणि महाराष्ट्राची परिस्थिती यामध्ये नेहमीच फरक पडतो. महाराष्ट्र हे अन्य राज्यांपेक्षा प्रगतीशील राज्य मानले जाते. हा नावलौकिक केवळ राजकीय दृष्ट्या नव्हेच तर केंद्रसरकारसाठी आणि अनेक राजकारण्यांसाठी महत्त्वाचा ठरतो. मुंबईतून केंद्राला मिळणारे उत्पन्न हे अन्य राज्यांपेक्षा दहापट जास्त आहे. आयकर, अबकारीकर किंवा आयात शुल्कापासून केंद्राला एकटया मुंबईतूनच भरपूर महसूल मिळत असतो. अशा इतर गोष्टींचाही मंत्रिपदे देताना विचार करावा लागतो. त्यामुळे महाराष्ट्राला झुकते माप मिळाले असले तरी देशासाठी सुध्दा महाराष्ट्र आपला वाटा योग्यप्रमाणात उचलत असतो

### महाराष्ट्रातील लोकांच्या अपेक्षा

आता शपथविधी सोहळयाचे कवित्व न करता मोदी सरकारने कामाला लागले पाहिजे. खाते वाटप जाहीर झाल्यामुळे मंत्र्यांनी आपला कार्यभार स्वीकारून लोकहिताचे निर्णय घेतले पाहिजेत लोकांना मोदी सरकारकडून फार मोठया अपेक्षा आहेत त्या पूर्ण करण्याची जबाबदारी एकटया मोदींची नाही तर त्यांच्या मंत्रिमंडळातील सगळया मंत्र्यांनी आपापल्या कामाचा योग्य तो वाटा उचलून ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे म्हणजेच लोकांनी मतदान करताना मनामध्ये ज्या अपेक्षा ठेवल्या होत्या त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्राच्या सहाही मंत्र्यांकडून विकास कामाबाबतही षटकार ठोकले गेले पाहिजेत तरच अगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा सेना महायुतीला सत्ता मिळविणे सोपे जाईल प्रामुख्याने गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी, अनंत गीते यांच्यावर विशेष जबाबदारी आहे त्यांच्याकडे असलेली महत्वपूर्ण खाती महाराष्ट्राच्या जनतेला नक्कीच दिलासा देणारी ठरू शकतात. अशा प्रकारच्या महत्त्वपूर्ण योजना कार्यान्वित करण्याकरिता तातडीने प्रयत्न केले पाहिजे.

कारण विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी महाराष्ट्रामध्ये काही मोठया विकास प्रकल्पांची सुरुवात होऊ शकते. लोकांना नवे सरकार किंवा त्यातले मंत्री कामाला लागले आहेत असे वाटू द्यायचे असेल तर महाराष्ट्राने आघाडी द्यायला हरकत नाही. गोपीनाथ मुंडे हे राज्याचे उपमुख्यमंत्री असताना त्यानी अनेक महत्त्वपूर्ण कामे पूर्ण केली होती. त्यांच्याकडे गृहखाते होते आणि महाराष्ट्रातील राजकारणातल्या गुन्हेगारीकरणाचा नायनाट करण्याचे श्रेय मुंडे यांच्याकडे जाते तर नितीन गडकरी यांनी पुणे मुंबई हा अतिशय आधुनिक स्वरुपाचा महामार्ग निर्माण करून एक वेगळेच उदाहरण समोर ठेवले. मुंबईतल्या ५५ उड्डाणपुलांची कामे ते सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री असल्यामुळे पूर्ण होऊ शकली. या दोघांनी जरी येत्या तीन महिन्यामध्ये आपल्या कामाचा सपाटा दाखविला तरी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजपा सेनेला त्याचा राजकीय फायदा होऊ शकेल, राजकारणाच्या निमित्ताने का होईना मागे पडलेला महाराष्ट्र विकासाच्या क्षेत्रात पुन्हा अग्रेसर होऊ शकेल.

### मंत्र्यापुढे भरपूर कामे

अगदी निवडणुकीपासूनच 'अबकी बार मोदी सरकार' अशी घोषणा देऊन लोकांना आकर्षित केले गेले. नवे सरकार यापूर्वीच्या मनमोहनसिंग सरकारपेक्षा सामान्य माणसाचे हित पाहणारे असेल असे ही चित्र रंगविले गेले आहेत. ते केवळ चित्र न राहता प्रत्यक्षात आले पाहिजे. अगदी महाराष्ट्राच्या बाबतीत सांगायचे तर राज्यात बेरोजगारी आणि ग्रामीण भागातील जमीन अधिग्रहणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.जलसिंचनाच्या बाबतीत काँग्रेससरकारने फक्त भ्रष्टाचारच केला. सत्तरहजार कोटी खर्च होऊनही शेकडो एकर जमीन जलसिंचनापासून वंचित राहीली दरवर्षी पडणारा दुष्काळ पाण्याची टंचाई असे ग्रामीण भागाला भेडसावणारे मोठे प्रश्न आहेत तर शहरांमध्ये घराच्या वाढत्या किंमती सामान्य माणसाचे टाळके शेकून काढत आहेत.

स्वच्छता आरोग्याच्या सोयी आणि इच्छा असूनही महाग होत चाललेले शिक्षण लोकांच्या आवाक्याबाहेर जात आहे. मुंबईसारख्या महानगरीत वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. उपनगरीय रेल्वेतील गर्दी मुंबईकरांना हैराण करीत आहे. याच औद्योगिक नगरीतला कामगार वेगवेगळया कारणांनी भरडला जात आहे. अशा विविध समस्यांचा विचार केला तर नव्या मंत्र्यांपुढे कामाचे मोठे आव्हान आहे. अगामी विधानसभा निवडणूक आणि लोकांच्या मनातील अपेक्षा याचा समतोल साधायचा असेल तर महाराष्ट्रातील मंत्र्यांनी आता मिळालेल्या झुकत्या मापाचा सरकत्या वेगाने उपयोग करून घ्यावा.